अभिरुची

मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

२०१६ अंक #३

या अंकात

- संपादकीय — अजित नातू
- अध्यक्षीय — विक्रम बोबडे
- देहाची तिजोरी — कुमार कुलकर्णी
- २०१६ उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर — कार्यकारिणी
- कथा सॅमसंगची — उल्हास हरी जोशी
- उतारवयातील एकटेपणा — अरविंद साने
- BMM अधिवेशन, माहिती — अनघा हुपरीकर, मिशिगन
- कविता - निळाई — प्रज्ञा मराठे
- नेहेमीची सदरे — अजित नातू
- पाककृती — सुनीती सहस्रबुद्धे
- शब्दकोडे
- कार्यक्रमाचे फोटो साईट लिंक्स — कार्यकारिणी

संपादकीय

संपादक - अजित नातू

नमस्कार मंडळी

दिवाळीच्या सणा, आनंदा नाही तोटा! हे आपल्या लहानपणी किती खरे होते. ३ आठवड्याची सुट्टी, फटाके, खास फराळ, मुलांना पालकाकडून भेटी (बहुतेक करून नवीन शर्ट विजार!), मित्र, भरपूर खेळ! काय धमाल होती! नाही म्हणायला, 'सुट्टीचा अभ्यास' सतवायचा खरा, पण नातेवाईक, फटाक्यात विसराचे ते!

> सगळे होतेच ते किती लोभस!
> लहानपणासारखेच ते निरागस!
> नव्हते कोठले बंधन अन त्रास!
> परत येतील का ते रम्य दिवस!

दिवस परत येत नसतात! पण तसे दिवस आपल्या मुलांना ह्या दिवाळीत देऊया हा निश्चय तर करूया!

तर मंडळी,

मंडळाच्या मासिकाचा २०१६चा हा तिसरा अंक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे. मागील अंकाप्रमाणे या अंकालाही तितकाच किंवा जास्त जोमाने प्रतिसाद मिळेल हि इच्छा करतो. साहित्य हा तर मराठी लोकांच्या जीवनातील अविभाज्य भाग मग कोणताही सण, ऋतू असो. मराठी साहित्य जागे ठेवण्यासाठीच तर हा मराठी मासिकाचा खटाटोप. खऱ्या दिवाळी अंक ह्या तोडीला हा अंक जरी नसला नसला तरी थोडी ति प्रथा चालू ठेवायचा आमचा प्रयत्न. तो गोड मानून घ्या हि विनंती.

विक्रम बोबडे यांनी गेल्या काही महिन्यातील मंडळाच्या कामाचा आढावा लेखाद्वारे सादर केला आहे तो नक्की वाचा. त्याबद्दल विक्रमचे आभार.

कुमार कुलकर्णी यांनी त्यांचे रात्रीच्या शांत प्रहरी सुचलेले विचारमंथन लेखांकित करून पाठवले त्याबद्दल त्यांचे धन्यवाद! त्यांच्या त्या विचाराची बैठक अध्यात्मिक चिंतनातून साकार झाली आहे हे कळून येते व

त्या लेखातील एक ठळक विचार सगळ्यांनी लक्षात घ्यावा व तो म्हणजे "दक्षिणेकडे वा डावीकडे गेलास तर तुझी अधोगती होईल, उत्तरेकडे वा उजवीकडे गेलास तरच तू मला (ईश्वराला) येऊन मिळशील".

मंडळाचे उरलेले वार्षिक कार्यक्रम व तारखा यांचा तक्ता कार्यकारिणीतर्फे सादर केला आहे. तो नक्की वाचा व तारखांची नोंद घ्या. सर्व कार्यक्रमाना आपण प्रत्यक्ष भेटू. तशी मनापासून विनंती.

श्री. अरविंद साने यांनी (मोनिका सानेचे सासरे) ह्या मासिकाला नेहेमीच लेखांद्वारे मदत केली आहे. यावेळीहि त्यांनी अमेरिकेतील वास्तव्य व अनुभव यांवरून एक छान असा "उतारवयातील दिवस" कसा व्यतीत करतात ह्याचे लेखन केले आहे. स्वतःला उत्साह असला तरी तरुण मंडळीत सामावून घेतले जात नाही हि एक बोच त्यांना टोचते. त्यांच्या अनुभवावरून आपणहि सर्व कोठल्या रहाटगाडग्यातून प्रवास करणार आहोत हे जाणवते. त्यांचा दिनक्रम पुढे खूप जणांना हुबेहूब लागू पडेल असे वाटते. अरविंद साने यांचे खूप आभार. ते नियमित लिहितात, तो त्यांचा छंद, आवड आहे. पुढेपण असेच लेख मिळावेत हि विनंती.

मागील महिन्यात आपल्या सभासद, फोलसमवासीय, अमिता नातू यांच्या वडिलांशी बोलण्याचा योग आला - उल्हास जोशी त्यांचे नाव. बोलता बोलता विषय अनुभवांवर, साहित्यावर स्थिर झाला. मग लक्षात आले कि उल्हास जोशी यांनी अनेक प्रकारचे लेख लिहिले आहेत. माझीही तीच आवड, त्यामुळे वेळ कसा गेला कळलेपण नाही. त्यांना लेख द्यायची विनंती केली व त्यांनीहि काही आढेवेढे न घेता मान्य केली. सॅमसंगच्या स्मार्टफोनची कीर्तीतर सगळ्यांना माहित आहे, पण सॅमसंग हा माणूस कोण होता, कसा घडला, किती पातळ्या चढून जगन्मान्य शिखरावर जाऊन पोहोचला. उल्हास लेखात म्हणतात, वाण्याचे दुकान ते जगातील सर्वात बलाढ्य कंपन्यांपैकी एक असा सॅमसंगचा प्रवास थक्क करणारा आहे. हा लेख नक्की वाचा व लेख दिल्याबद्दल उल्हास जोशी यांचे मनःपूर्वक धन्यवाद. यापुढील अंकातपण तुमचे लिखाण सहभागी करूच व ते मिळेल हि खात्री व उल्हासना विनंती.

२०१७ मध्ये "BMM Convention" मिशिगनमध्ये होणार आहे. Detroit मराठी मंडळाला व त्या कार्यकारिणीला अनेक शुभेच्छा व पाठींबा. अनघा हुपरीकरांनी त्याबद्दल flyer पाठवला तो ह्या अंकात आहे. कोणाला जास्त माहिती हवी असेल तर त्यांच्या इमेलला प्रश्न, सूचना पाठवा किंवा मला सांगा मी त्यांच्याशी बोलू शकतो.

फक्त काही वर्षेच इथे वास्तव्य केलेल्या अनघा महाजन यांच्या आई-वडिलांशी अचानक योगायोगाने ओळख झाली. इतके त्या सगळ्याच कुटुंबाशी घरोब्याचे संबध जुळले कि जरी ४-५ महिनेच ओळखीचे झाले तरी लहानपणापासून जणू ओळख असे आपुलकीचे नाते जुळले. प्रज्ञा मराठे व रत्नाकर मराठे अशी त्यांची नावे. रत्नाकरांशी किती तास गप्पा केल्या याचा हिशेब नाही, पण प्रज्ञाताई त्याहुन बोलक्या -

मुळच्या शिक्षिका, मग नवल ते काय. मी, माझी बायको माधुरी, व हि दोघे असेकाही मेतकुट जमले कि विचारू नका. मग कळले, प्रज्ञाताई लेखन करतात, कविता करतात. अशीच त्यांची एक कविता या अंकात उपलब्ध करून देत आहे. त्यांच्या छोट्या वास्तव्यातील एका प्रवासात निसर्ग बघून सुचलेले काव्य त्यांनी आपल्याला दिले याबद्दल त्यांचे अनेक आभार. ती कविता तुम्ही वाचलीत व लेकटाहो अन तेथील बर्फ आठवलात तर त्यांचे काव्य मनाला भिडेल, पटेल.

बाकी इतर नेहेमीची सदरे, जसे हे करून बघा, सुविचार, विनोद, शब्दकोडे, 'माहिती आहे का' वगैरे याही अंकात आहेत, काही माहितीवर आधारित आहेत. ते सगळे सदर तुम्ही नक्की वाचा. . विशेष म्हणजे शुभांगी चिटणीसच्या आईने दिलेली एक खास पाककृती. 'उकडीच्या मोदकाची' त्यांची पाककृती वाचून नक्की मोदक करायची इच्छा होईल याची खात्री आहे. सुनीतीताई सहस्रबुद्धे यांनी हि पाककृती दिल्याबद्दल त्यांचे व शुभांगीने त्यांच्या पाठीलागून ती मला पाठवल्याबद्दल तिचेही खूप आभार!

जाहिरातदार तर किती महत्वाचे हे आपल्याला माहितीच आहे. सर्व जाहिराती वाचा, त्यातील लिंकवर जाऊन माहिती घ्या आणि ह्या जाहिरातदारांशी संपर्क साधा.

पुन्हा एकदा सर्व लेखकांचे मनापासून आभार. वाचकांना यावरून स्वतः लेख, कविता किंवा संबंधित विषयांवर लिखाणाची स्फूर्ती मिळेल अशी आशा करतो. मंडळातील सर्व लोकांना असे काही लेख, कविता, पाककृती, फोटो, इतर काहीही तुमचे स्वतःचे किंवा तुमच्या जवळच्या नातेवाईकांचे लिखाण ह्या मासिकासाठी पाठवा अशी विनंती आवर्जून करतो. मराठी लिहिण्याचा सराव आपण सर्वच मायदेशी ठेऊन आलो आहोत, त्यामुळे ह्या अंकात काही चुका झाल्या असतील, व्याकरण चुकले असेल, इंग्रजी शब्द आले असतील किंवा तपशील चुकला असेल तर खरच मनापासून क्षमस्व. मराठी जागे ठेवायचा हा एक प्रयत्न ह्याच फक्त दृष्टीने पहा व वाचा.

ह्या आवृतीबद्दल अभिप्राय आवर्जून मला व कार्यकारिणीला कळवा. कारण त्यातून सुधारणा व्हायला मदत तर होतेच शिवाय असे मराठी मासिक चालू ठेवायला उत्साहपण येतो.

धन्यवाद!

अजित नातू
(संपादक, अभिरुची त्रैमासिक, mmsac)
ajit_natu@hotmail.com

PNG JEWELLERS WISHES YOU
HAPPY DIWALI
THIS DIWALI GET
25% OFF* on entire Diamond Collection
20% OFF* on Silver Collection
upto 10% OFF* on selected Gold Jewelry
Get a FREE Silver Coin on your Jewelry Purchase.
PNG JEWELLERS
PARAMPARA ACHCHAI KI
SINCE 1832
PNG Jewelers INC
820E El Camino Real, Sunnyvale, Ca 94087. Ph.: (408) 245-6764 | 3760 Mowry Ave., Fremont, Ca 94538. Ph.: (510) 791-3357
www.pngjewelers.com | PNGJewelersUSA

अध्यक्षीय - विक्रम बोबडे

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम आपणासर्वांना माझ्याकडून आणि आमच्या कार्यकारिणीतील इतर सर्व सदस्यांकडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा ! गेल्या तिमाहीत आपल्या मंडळाने कॅम्पिंग (ऑगस्ट), गणपती (सप्टेंबर), कार्टी काळजात घुसली (सप्टेंबर), डॉ. विकास बाबा आमटे ह्यांचा सत्कार (सप्टेंबर), आकाशकंदील कार्यशाळा (ऑक्टोबर) आणि कोजागिरी (ऑक्टोबर) असे विविधरंगी कार्यक्रम आयोजित केले. आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद दिलात त्याबद्दल मनापासून आभार. खासकरून सप्टेंबर महिना आमच्या कार्यकारिणीची अक्षरश: परीक्षा घेणारा ठरला. गणेशोत्सवाच्या आमंत्रणाला आपणसर्वांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. आमच्या अंदाजापेक्षा कितीतरी जास्त लोकांनी गणेशोत्सवासाठी येण्याची तयारी दाखवली आणि त्यामुळे आम्हाला वेळेवर धावपळ करत कार्यक्रमासाठी मोठ्या हॉल ची व्यवस्था करावी लागली. पण मला सांगायला अतिशय आनंद होतो आहे कि कार्यकारिणीने डगमगून न जाता हे आव्हानं स्वीकारलं आणि हॉल, प्रसाद, जेवण इं. सर्व आघाड्यांवर अतिशय चोख व्यवस्था केली. अर्थात हे सर्व करण्यात स्वयंसेवकांचाही मोठ्ठा वाटा होता हे सांगणे न लगे. श्रींच्या मूर्ती साठी "लेक टाहो" चा अतिशय सुंदर देखावा स्वयंसेवकांनी दिवसरात्र मेहेनत करून तयार केला होता. गणेशोत्सवासारख्या मोठ्या कार्यक्रमा नंतर जराही उसंत न घेता कार्यकारिणीने "कार्टी काळजात घुसली" ह्या व्यावसायिक नाटकाचा प्रयोग यशस्वीपणे आयोजित करून मराठी मंडळ सॅक्रामेंटो मध्ये एक इतिहास घडवला. ह्या मागेही स्वयंसेवकांची प्रचंड मेहेनत आहे. कित्येकजण अक्षरश: काही महिन्यांपासून ह्या नाटकाच्या आयोजनासाठी झटत होते. बे एरिया येथे जाऊन नाटकाचा सेट आणणे, तो इथे व्यवस्थिक उभा करणे आणि नंतर तो परत पोहचवून देणे हे प्रचंड वेळखाऊ काम होतं. त्याचबरोबर नाटकात वापरल्या जाणारी "प्रॉपर्टी" गोळा करणे, प्रयोगाच्या दिवशी त्या सगळ्या वस्तू व्यवस्थितपणे सेट वर उभ्या करणे आणि नंतर त्या वस्तु त्यांच्या मालकांकडे सुपूर्द करणे हे सुद्धा खूप मेहेनतीचं आणि वेळखाऊ काम होतं. ह्या नाटकाच्या निमित्ताने आपल्यासर्वांना "टीम-वर्क" चं एक उत्तम उदाहरण बघायला मिळालं. प्रशांत दामलेसारख्या दिग्गज कलाकाराने सॅक्रामेंटो मध्ये नाटकाचा प्रयोग सादर करणे आणि आपल्या मंडळाचं कौतुक करणे हि आपल्यासर्वांसाठी फार अभिमानाची गोष्ट आहे. सप्टेंबर महिन्यातल्या ह्या दोन मोठ्या कार्यक्रमांना यशस्वी करून आपल्या मंडळांनी सिद्ध केलं आहे कि आपणही एखाद्या मोठ्या मंडळाप्रमाणे उत्तम दर्जाचे कार्यक्रम यशस्वीपणे

आयोजित करू शकतो. मंडळी, आपलं स्वप्नं आता आणखी मोठं करायला हरकत नाही. आता आपणही भविष्यात बी.एम.एम कन्व्हेंशन आयोजित करण्याचं स्वप्नं बघायला हवं नाही का ? आपण मंडळाच्या कार्यक्रमांना भविष्यातही असाच भरघोस प्रतिसाद द्याल हि आशा करतो. हे मंडळ आपल्यासर्वांचं आहे आणि प्रत्येकानी हक्कानी सामील झालं पाहिजे. आपण सर्व आहात म्हणून हे मंडळ आहे. कार्यक्रमांना येत चला आणि जमेल तेवढी मदत करा.

मंडळी, सप्टेंबर महिन्यात अचानकपणे योग जुळला तो डॉ. विकास बाबा आमटे ह्यांच्या भेटीचा ! आपलं मंडळ हे नुसतं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे ह्यासाठी नसून जमेल तेंव्हा सामाजिक कार्याला हातभार लावणे हा सुद्धा आपला उद्देश आहे. गेल्या वर्षी मंडळाने "नाम" फौंडेशन साठी मदतनिधी गोळा केला होता तर काही वर्षांपूर्वी डॉ. प्रकाश बाबा आमटे ह्यांच्या लोकबिरादरी प्रकल्पासाठी मदतनिधी गोळा केला होता. डॉ. विकास आमटेंच्या भेटीच्या निमित्ताने आपल्या मंडळाने ह्यावर्षी "आनंदवन" साठी मदतनिधी गोळा करण्याचा मानस आखला आणि त्याला सुद्धा आपण भरभरून प्रतिसाद दिलात त्याबद्दल मंडळ आभारी आहे. लवकरच आम्ही गोळा केलेला हा मदतनिधी "आनंदवन" ला सुपूर्द करणार आहोत. डॉ. आमटे आणि श्री. गौतम कराजगि ह्यांच्या भाषणांमधून तसेच कार्यक्रमात दाखवण्यात आलेल्या चित्रफितीतून आनंदवनात होत असलेल्या प्रगतीबद्दल माहिती मिळाली आणि फार आनंद झाला. पण त्याच बरोबर हा प्रवास फार मोठा आणि खडतर आहे ह्याची जाणीव झाली.

मंडळी, अभिरुची ह्या वर्षीचा हा तिसरा अंक आपल्या पर्यंत पोहोचवतांना मला खूप आनंद होत आहे. कृपया आपण तो संपूर्ण वाचवा हि अपेक्षा. आपल्या काही सूचना असतील तर त्या नक्कीच आमच्यापर्यंत पोहोचवा. ह्या अंकासाठी अजित ने भरपूर मेहेनत घेतली आहे. त्याला आणि ज्यांनी ह्या अंकासाठी साहित्य पाठवलं आहे त्यांना मी खूप-खूप धन्यवाद देतो.

पुन्हा एकदा आपल्या सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!!

आपला नम्र
विक्रम बोबडे, अध्यक्ष मराठी मंडळ साक्रामेंटो २०१६-१७

Laxmikant Pokle
Realtor®
CaBRE #01986685
Century 21
Select Real Estate
6300 Florin Rd
Sacramento, CA 95823
Office: 916-394-8705
Direct: 916-695-7703
eFax: 916-394-8805
lpokle@c21selectgroup.com
laxmikant.pokle.c21selectgroup.com
MLS
Each office is independently owned and operated

mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

लेख: देहाची तिजोरी

लेखक: कुमार कुलकर्णी

अचानक आज पहाटे तीन साडे तीनलाच जाग आली. परत झोप येईनाशी झाली, उठून वाचीत बसावे म्हणून हाताला लागले ते तत्वबोधाचे पुस्तक घेतले. जे पान उघडले त्या पानावर प्रश्न होता, स्थूलशरीरम किम् ? ह्या प्रश्नांचे उत्तर देताना श्री शंकराचार्य म्हणाले,

सुखदुःखादि भोगायतनम् शरीरं.

हे वाचल्याबरोबर सारे काही भोवताली शांत असताना भान विसरून मी मोठमोठ्याने हसायला लागलो. ५ - ७ मिनिटे झाली तरी मला हसू काही आवरेना. इतका तो विचार मला पटला, इतका भावला कि माझे मलाच भान राहिले नाही. ह्या देही मी जन्म घेतला खरा, आजपर्यंत ह्या देहाने, मनाने सुख दुःखाशिवाय काय पाहिले? ह्यातून बाहेर पडायचे तर उत्तर शोधायला पाहिजे म्हणून माझी अत्यंत आवडती "ज्ञानेश्वरी" चा ९वा अध्याय काढून वाचायला लागलो.

“विराल्याविना देही देहभाव, जनी म्हणे, देव न ये हाता”, म्हणजे काय ते कळायलाच पाहिजे. ९ व्या अध्यायात नवविधा भक्तीचे वर्णन माऊलीने गुह्यतमं म्हणजे अति गोपनीय असे केले आहे. ६ व्या अध्यायात राजयोग साधून अर्जुना, तू माझ्यापर्यंत पोचशील असे भगवंताने म्हटल्यावर अर्जुन म्हणाला हा कठीण मार्ग मला झेपणार नाही, तेवढा माझा अधिकार नाही, तेवढी माझी योग्यता नाही. तेव्हा ह्यापासून सोपा मार्ग मला सांगा अशी विनवणी केल्यावर भगवंतांनी निरतिशय व आत्यंतिक प्रेमपूर्वक माझी भक्ती कर म्हणजे तू मलाच येऊन मिळशील असे म्हटले. लहान मूल आपल्या वडिलांबरोबर जेवावयास बसल्यावर आपल्या पानांतील घास स्वतः न घेता वडिलांना भरवते तेव्हा ते निर्मळ प्रेम पाहून बापाचे डोळे वात्सल्याने भरून येतात. असे निस्सीम प्रेम म्हणजेच भक्ती असा निर्वाळा ज्ञानोबाराय देतात. दूध दुभत्याचे आशेने जग गाईच्या गळ्यात दावे बांधते पण दाव्यावाचून ज्याच्यासाठी ती पान्हावते तो वत्स वेगळाच. गाईचे वासरू जसे तन मनाने आपल्या मातेकडे धाव घेते तसा ज्ञानी भक्त देवाकडे धाव घेतो.

लहानश्या झोपडीत माता आपल्या लहानग्याला जवळ घेऊन झोपलेली असते. कितीही शाकारले तरी भिंतीतून, छपरातून पाऊस पाणी, ऊन वारा आंत येणारच की! कितीही वारा पाऊस आत आला तरी आई अगदी गाढ झोपलेली असते, तिची झोप काही वीजांच्या कडकडाने वा पावसाच्या थेंबामुळे चाळवत नाही पण तिच्या सोनुल्याने झोपेत जरा जरी चाळवाचाळव केली किंवा त्याने हात जरी हालवला तरी ती लगेच सावध होऊन त्याला थोपटते.

हे जसे सारे खरे तसेच परमेश्वराच्या भक्तीचे आहे. हसता बोलता, काम करतांना, वा स्वस्थ बसले असतांना, सतत त्याचा निदिध्यास, सजगता अंगी असणे म्हणजे त्याची भक्ती असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात. ज्ञानभक्ती म्हणजे अद्वैतभक्ती हा सिद्धांत संपूर्ण ज्ञानेश्वरीभर पसरलेला आहे.. ज्ञानीभक्त हा परमेश्वरासारखाच अनिर्वचनीय होऊन जातो. भक्ताची एकरूपता कशी होते ते सुद्धा माऊली अनेक उदाहरणांचा आधार घेऊन सांगतात, जसे, बांगडीतून सोने वेगळे काढता येईल का, कापरापासून त्याचा वास बाजूला करता येईल का, रत्नांपासून त्याची प्रभा कशी वेगळी करायची अथवा माती व माठ (घट) ह्यांना वेगळे करता येईल का? आणि मग भक्तांसाठी देवाची अवस्था कशी होते हे सांगतांना ज्ञानदेव म्हणतात, त्याचा सारा योगक्षेम मीच वाहतो, भक्ताला काही करावयाचे राहतच नाही. जसे,

> जनी जाय पाणियासी, मागे धावे ऋषिकेशी
> पाय भिजो नेदी हात, माथा घागरी वाहत किंवा
> दास म्हणे जाता शरण, हरी वाट पाहे

भगवंत पुढे अर्जुनाला सांगतात की अर्जुना, आता माझे मत विचारशील तर सगुण भक्त मला अधिक जवळचा व अति प्रिय आहे. सगुणाची भक्ती करणारे सारे फक्त नित्य आणि नैमित्तिक कर्म करीत राहतात आणि त्याची कर्मफळे मलाच अर्पण करतात.

वद्यपक्षात जसे चंद्रबिंब हळूहळू लहान होत अमावास्येला पूर्ण नाहीसे होते तसे तुझे चित्त तू संसारातून कमी कर. तेहि तुला करणे अवघड वाटत असेल तरी चालेल, कुळधर्म, कुळाचार, विधीनिषेध, अभिमान काही सोडू नकोस, फक्त एक कर; मी केले हा कर्तेपणाचा अहंकार बाळगू नकोस. आगीचा लोळ जसा आकाशात विरून जातो त्याप्रमाणे तुझ्या साऱ्या क्रिया, सारी कर्म शून्यात विरून जाऊ दे. एवढे केलेस तरी तू मलाच येऊन मिळशील.

अरे हा देह म्हणजे चौरस्त्यावर मधोमध उभे राहिल्यासारखे आहे, दक्षिणेकडे वा डावीकडे गेलास तर तुझी अधोगती होईल, उत्तरेकडे वा उजवीकडे गेलास तरच तू मला येऊन मिळशील. आजवरच्या कर्मातून, इतक्या आयुष्यभर केलेल्या हडेलहप्पीतून खरंच काही हाती लागले नाही, इतके काही जवळ असल्यानंतरही तुला अपूर्णत्व जाणवत असेल तर हे जे आयुष्य तुला मिळाले आहे त्याचा उपयोग करून घे. भक्तीचा हा मार्ग सामान्यांपासून सगळ्यांना आचरणांत आणण्यासारखा व अगदी सोपा आहे. फार काय सांगू अरे माझे सारे भक्तमंडळी काय काय म्हणतात,

> राम बुलावा भेजिया, दिया कबीरा रोये
> जो सुख साधू संग मे, सो वैकुंठ ना होये

अरे नामांचा आनंद एवढा आहे की हे सांगताना भगवंत अर्जुनाला म्हणतात कि एकवेळ मी वैकुंठात सापडणार नाही पण जेथे जेथे अखंड नामसंकीर्तन चालले आहे अशा भक्तांच्या हृदयांत मी नक्की

सापडेन.. तुकाराम महाराज म्हणतात,

> नको वैकुंठाचा वास, असे तया सुखा नाश
> अदभूत हा रस, कथा काळी नामाचा,

एवढेच नाही तर ते भगवंताला पुनः पुन्हा प्रार्थना करतात,

> न लगे मुक्ती आणि संपदा, संत संग देई सदा
> तुका म्हणे गर्भवासी, सुखे घालावे आम्हांसी

काय सांगावे, एवढे सगळे २ -३ तास मन:पूर्वक विचार मंथन झाल्यावर मी पुन्हा अति समाधानाने दोन तास शांत झोप घेतली.

धन्यवाद,
कुमार कुलकर्णी

KIFS Kotwal Insurance & Financial Services

People don't plan to fail, They just fail to plan

When it comes to happy retirement, key is to plan well.

Dear Friend,

Just Half an Hour with Me Can HELP you:

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

Ray Kotwal, MBA Finance

Life Insurance and Planning Specialist

Insurance License No. OH12645

Remember KIFS for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com

या वर्षातील आत्तापर्यंतच्या कार्यक्रमाना सभासदांचा भरगोस पाठींबा लाभला, त्याबद्दल मनापासून धन्यवाद. तसाच, किंबहुना त्याहूनही जास्त उपस्थिती वरील दोन कार्यक्रमाना मिळेल याची अशी मनापासून विनंती. २०१६च्या कार्यकारिणीने सुंदर काम करून छानच कार्यक्रम सादर केले त्याबद्दल कार्यकारिणीचे व मदतीचा हातभार लावणार्यांचे कौतुक, आभार, व धन्यवाद!


Watch
NARAYANAN MOHAN
Live
On NOV 25th 2016
CHENNAI,SOUTH INDIA
JUST DO IT.
WITH LEADING
CINE PLAY BACK SINGERS
A.R.RAIHANAH
MATHANGI
ALKA AJITH
DHANYA SHREE
MONICA
NARAYANAN MOHAN'S
MUSIC
BLAST
WITH LEADING
CINE PLAY BACK SINGERS
Fund Raising Programme
in AID OF
VEDIC INDIA SOCIETY (Old Age Home)
(Registered in US and Tamil nadu, India)
Michael
UK. MURALI
LIGHT MUSIC ORCHESTRA
Wave
DONATIONS ARE INVITED
November 25th 2016 (Friday), 6.30pm, Kamarajar Arangam,Chennai, India.
TAMIL, HINDI & MALAYALAM
SUPER HIT SONGS

लेख: कथा सॅमसंगची (Samsung)

लेखक: उल्हास हरी जोशी, (अमिता नातूचे वडील)

---

1) 1938 साली ली बियांग चल नावाच्या माणसाने दक्षीण कोरियामध्ये 'सॅमसंग' या नावाने किराणा मालाचे दुकान सुरू केले.

2) 1940 साली किराणा दुकानांमध्ये सुरु झालेल्या प्रचंड स्पर्धेमूळे त्याने किराणा मालाचे दुकान बंद करून नूडल्स बनवण्याच्या व विक्रीच्या व्यवसायाला सुरवात केली

3) 1950 साली सॅमसंगने नूडल्सचे उत्पादन बंद करून साखरेचे उत्पादन करायला सुरवात केली.

4) 1954 साली सॅमसंगने साखरेचे उत्पादन बंद केले व गरम कपडे बनवण्यासाठी वूलन मिल सुरू केली

5) 1956 साली सॅमसंगने वूलन मिल बंद करून इन्शुरन्स व सिक्युरिटिज विकायच्या व्यवसायाला सुरवात केली.

6) 1960 साली सॅमसंगने इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात प्रवेश केला व 'ब्लॅक ऍन्ड व्हाईट' टेलिव्हीजन सेट्स बनवायला सुरवात केली.

7) 1980 साली सॅमसंगने टेलिकॉमच्या क्षेत्रात प्रवेश केला व व टेलिफोन स्विच बोर्ड बनवायला सुरवात केली.

8) 1987 साली सॅमसंग कंपनीचा संस्थापक ली याचा मृत्यु झाला. त्यामूळे कंपनीचे विभाजन चार वेगवेगळ्या व स्वतंत्र कंपन्यांमध्ये झाले. डिपार्टमेन्टल स्टोअर्स, केमिकल्स व लॉजिस्टिक्स, पेपर व टेलिकॉम व इलेक्ट्रॉनिक्स असे विभाजन झाले.

9) त्याच साली सॅमसंगने जागतीक स्तरावर सेमिकंडक्टर प्लॅन्ट्समध्ये गुंतवणूक करायला सुरवात केली.

10) 1990 साली सॅमसंगने जागतीक स्तरावरची गुंतवणूक बंद करून रिअल इस्टेच्या क्षेत्रात प्रवेश केला. मलेशियामधील पेट्रॉनास टॉवर्स तसेच तैवानमधील तैपेई 101 या जगातील सर्वात उंच इमारतींचे बांधकाम सॅमसंगने केले.

11) 1993 साली मोठी मंदी आली. एशीयन मार्केटमध्ये मोठी मंदी होती. सॅमसंगला पण याचा मोठा फटका बचला. त्यावेळी लीच्या मुलाने कंपनीचा सीईओ म्हणून सूत्रे हातात घेतली होती. त्याने कंपनीचे डाऊनसायझींग करायला, कंपनीच्या उप कंपन्या म्हणजेच सबसिडिअरीज विकायला व उरलेल्या कंपन्यांचे एकत्रीकरण करायला सुरवात केली.

12) इलेक्ट्रॉनिक्स, इंजिनिअरींग व केमिकल डिव्हीजन्सचे एकत्रीकरण केल्यामूळे सॅमसंग ही जगातील मेमरी चिप्सचे उत्पादन करणारी सर्वात मोठी कंपनी बनली.

13) 1995 साली सॅमसंगने 'लिक्विड क्रिस्टल डिस्प्ले' च्या क्षेत्रात प्रवेश केला व केवळ 10 वर्षातच 'फ्लॅट स्क्रीन टेलिव्हिजन' बनवणारी जगातील सगळ्यात मोठी कंपनी बनली.

14) 2010 साली लिक्विड क्रिस्टल डिसप्लेच्या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाल्याने सॅमसंग कंपनीने पुढील 10 वर्षांच्या वाटचालीचे धोरण ठरवले व स्मार्टफोनच्या क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचे ठरवले.

15) 2016 सालामध्ये सॅमसंग ही मोबाइल फोन व स्मार्टफोन बनवणारी जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. आज सॅमसंगच्या स्मार्टफोनची विक्री आय फोनच्या विक्रीच्या दुपटीहून अधीक आहे.

आज सॅमसनंगची विक्री 250 बिलियन डॉलर्सपेक्षा अधीक आहे व दक्षीण कोरियाच्या एकूण एक्सपोर्टमध्ये सॅमसंगचा वाटा एक पंचमांश ईतका आहे.

किराणा मालाचे दुकान - नूडल्सचे उप्पादन - साखरेचे उत्पादन- वूलन मिल - इन्शुरन्स व सिक्युरिटिजची विक्री - टेलिव्हीजन सेट्सचे उत्पादन - टेलिफोन स्विच बोर्डचे उत्पादन - सेमिकंडक्टर प्लॅन्टमध्ये जागतीक स्तरावर गुंतवणूक - रिअल इस्टेट - मेमरी चिप्स - फ्लॅट स्क्रीन टेलिव्हीजन - मोबाइल फोन व स्मार्ट फोन असा सॅमसंगचा प्रवास आहे.

एक वाण्याचे दुकान ते जगातील सर्वात बलाढ्य कंपन्यांपैकी एक असा सॅमसंगचा प्रवास थक्क करणारा आहे.

तात्पर्यः-

बदल हा जसा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे तसाच तो बिझनेस, इंडस्ट्री व उद्योग व्यवसायाचा पण अविभाज्य भाग आहे. त्यामूळे बदल करायला घाबरू नका. तुम्ही जर बदल स्विकारला नाही तर तुम्ही नगण्य व्हाल! त्याच त्याच गोष्टी परत परत करण्याच्या मानसिकतेमध्ये अडकून पडू नका. त्यामूळे बोअर व्हाल. अयशस्वी होत असताना सुद्धा काही बिझनेस चालतच असतात ते एकप्रकारच्या अंतरीक उर्जेमूळे. या अपयशातूनच या कंपन्या प्रगती साधत असतात ते कशामूळे? कारण बिझनेसमधले अपयश हे तुम्ही प्रयत्न करता आहात याचे प्रतीक असते. ते नव्या पद्धतीने कंपन्यांची पुन्हा रचना करत असतात. नवी क्षेत्रे शोधून काढून त्यामध्ये शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत असतात. नवीन टेक्नॉलॉजी, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करीत असतात. नवीन पाण्यात शिरायचा प्रयत्न करीत असतात.

आता सॅमसंगचेच पहा. त्यांनी कित्येक असे बिझनेस केले की त्यांचा परस्पराशी काही संबंध नाही. पण परिस्थितीनूसार ते बदलत गेले. नवीन टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात प्रवेश करत गेले व नवीन टेक्नॉलॉजी आत्मसात करत गेले. स्वतःच्या कंपन्यांचा नव्याने शोध घेत नवीन कल्चर आत्मसात करत गेले.

बदल हाच आयुष्यातील एकमेव 'कॉन्सन्ट' आहे हे लक्षात ठेवा.

यशाचा कोणताही परफेक्ट फॉर्म्युला नाही. त्यामूळे सतत प्रयत्न करत रहा. योग्य वेळी बदल करत रहा. केव्हा ना केव्हातरी तुम्हाला यश हे नक्कीच मिळेल याची खात्री बाळगा. आपला बिझनेस किंवा उद्योग व्यवसाय यशस्वी करा! आयुष्यात यश मिळवा!

अर्थात आपण आयुष्यात व बिझनेसमध्ये यशस्वी व्हायचे की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवायचे नाही का?

(श्री. सुरेन्द्र श्रेष्ठ यांच्या सौजन्याने,)

धन्यवाद, उल्हास हरी जोशी

California IVF Fertility Center
In Collaboration with UC Davis Health System
Offices in Sacramento and Davis
Fertility Testing and Treatment
IVF, ICSI, and Inseminations
Tubal Reversal Surgery
Vasectomy Reversal
Genetic Testing of Embryos
PGD/PGS
Family Balancing (Boy or Girl)
Egg Donation Program
Donated Embryos
(530) 771-0177
www.CaliforniaIVF.com

लेख: उतारवयातील एकटेपणा लेखक - अरविंद साने

तीस नोव्हेंबर २००० रोजी निवृत्त झालो. त्या दिवशी आभाळ मोकळे झाल्यासारखे वाटले. त्यानंतर खूप आराम करायचा, भटकायचे, गप्पा मारायच्या, खायचे, प्यायचे आणि फक्त मजा करायची असे मनाने ठरवून ठेवले होते. काही दिवस तसे केलेही. पण पुढे काय? त्याचाही कंटाळा येऊ लागला. मात्र हे नवीन आयुष्य जगत असताना एक वेगळीच जाणीव होत होती. सगळयांमध्ये असून मी एकटाच असल्याचा मला साक्षात्कार होऊ लागला होता.

निवृत्ती नंतर मुलांना, आम्ही दोघेच पुण्याला राहण्यापेक्षां त्यांच्याबरोबर राहणे जास्त सोयीचे वाटले. त्यामुळे बंगलोर किंवा बोस्टन येथे आमचा मुक्काम पडत होता. मुला नातवंडांमध्यें वेळ कसा छान व भरकन जात होता. दोघांनाही एक मेकांचा आधार वाटत होता. आयुष्य कृतार्थ झाल्याची भावना मन भरून टाकीत होती.

मुलांचे संसार बहरात होते. त्यांचे व्याप वाढत होते. त्यांचे विषय वेगवेगळे होत होते. त्यांनाही अडीअडचणी, नोकरीत तणाव, मुलांचे संगोपन हे होतेच. पुढच्या आयुष्याचे प्लॅनिंग करण्यात ते खूप गुंतून गेले होते. नातवंडे मोठी होत होती. त्यांचे विश्व वेगळे होऊन गेले होते. या सर्व बदलामुळे ते सगळे व्यस्त झाले होते. आठवडा कसा सुरू व्हायचा आणि कसा संपत होता ते समजत नव्हते. सुरवातीला हे पाहताना खूप आनंद होत असे. ते अनुभविण्यात मजा येत होती.

पण हळुहळु या भावनेला दुसरा कंगोरा आला. त्या कंगोऱ्याचे टोक मनाला सलू लागले. बोचू लागले. मुलाबाळात असून, सगळयांबरोबर असूनही आपण एकटेच आहोत असे सतत वाटायला लागले. आपला कशासाठीही उपयोग नाही, साधे घरातील फर्निचर हालवायचे असेल तरी, आपल्याच्याने होत नाही. शिवाय मेहेनतीची कामे आपण करू नये याकडे मुलांचे जाणीवपूर्वक कटाक्ष असे. त्यामुळे बहुतेक बाबतीत मला बघ्याचीच भूमिका वठवावी लागत असे. माझी मदत होण्यापेक्षा माझी मधेमधे होणारी लुडबुड मुलांना अडचणीची वाटते असा माझा समज होऊ लागला होता.

मुलांचे दर आठवडयाला वेगवेगळे कार्यक्रम ठरत असत. जवळच्या मित्रांकडे गप्पासाठी, समारंभासाठी, किंवा एकाद्या सहलीसाठी जाण्याचे त्यांचे ठरत असे. अशावेळी बाबांना न्यायचे तर त्यांना शारिरीक अडचणी येतील, त्यांना तिथे कोणी कंपनी मिळेल कां? आपण मित्रांबरोबर असताना त्यांना दुर्लक्षिले असे वाटेल कां? अशा प्रकारच्या अनेक शंका मुलांच्या मनात आल्या वाचून रहात नसत. आणि त्या अगदी स्वाभाविकच होत्या. हे माझ्या लक्षांत येऊ लागले तेव्हां मात्र मन वेगळयाच प्रकारे विचार करू लागले. आपण जाणे बरे नाही. कारण त्या मुळे त्यांनाही धडपणे एंजॉय करता येणार नाही. त्यापेक्षां आपण घरातच बसलेले काय वाईट? मात्र अशा वेळी आपण आता कशासाठीही उपयोगाचे राहिलो नाही, किंवा आपल्या अत्सित्वाचा आनंद इतरांना होण्याापेक्षा त्यांना अडचणच जास्त होते अशी भावना प्रबळ होत चालली होती. सगळयापासून अलिप्तता जास्त येत चालली होती. यात कोणाबद्दल तक्रार नसून स्वतःच्या या अवस्थेचे विष्लेशण मन करत होते. नवीन पध्दतीचे आयुष्य जगण्याची मनाची तयारी सुरू होत होती.

काही दिवसांपूर्वी नातवंडे सतत अवती भोवती असत. सर्वात छोटा नातू तर टी.व्ही पाहायला माझ्याजवळच बसत होता. त्याला क्रिकेटच्या खेळातील किस्से, खिलाडी, आंतरराष्ट्रीय सामने त्याची रेकॉर्डस्, रोजचा स्कोअर मी सांगावे लागत होते. रात्री माझ्या जवळ झोपून महाभारत व रामायणातील गोष्टी ऐकायला आवडत असे. संगणकावरील पत्ते, चेस इ. गेम्स त्याला मी समजावून द्यायला हवे असे. परंतु ती मोठी झाली. त्यांचे विषय वेगळे झाले. खेळांमधील त्यांचे इंटरेस्ट बदलले. बास्केटबॉल, फुटबॉल, बेसबॉल, यासारख्या खेळांमध्यें त्यांना रस निर्माण झाला. अर्थातच या खेळांपासून मी दूर होतो. त्याचे नियम, खेळाडू याबद्यल मला माहिती कमी होती. त्यामुळे नातवंडेच मला ते समजावून सांगू लागले पण त्या साठी त्यांच्या जवळ फारसा वेळ नसे. वेगवेगळे इलेक्ट्रॉनिक्स गेमस् त्यांच्या हातात आले. संगणकातील क्रांतीमुळे टॅब्लेट, आय् फोन, टी.व्ही. वर खेळता येणारे नवनवीन खेळ त्यांच्या हातात आले. हे सगळे हाताळण्याचे आणि त्याचा उपभोग घेण्यासाठी त्यांना उपजतच

ज्ञान होते. मला मात्र प्रत्त्येक गोष्ट, त्याचे तंत्र, याचा अचंबाच जास्त वाटत होता. ते मला वापरायला येणे कठीण होत असे. मग प्रत्त्येक अडचणीना त्यांना हाक मारावी लागत होती. त्यांना त्या मुळे थोडे का होईना डिस्टर्ब होत होते. येणाय्रा गोष्टींचे नाविन्य वाटून आवाक व्हायला होते. पण त्याच बरोबर आता आपण या नवीन युगाच्या फार मागे पडत आहोत हे जाणवत होते. नाविन्याची कास धरायला आपली एनर्जी, आपली आकलन शक्ती कमी पडते आहे हे समजून येत होते. आपण काळाच्या मागे पडत असून सुधारणेचा वेग आपल्याला पकडता येत नाही असे वाटत असे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर आपण आउटडेटेड होत आहोत अशी खात्री होत होती.
लग्नानंतरची मागची अनेक वर्षे पत्नीची सतत साथ होती. दोघांना एकमेकांची गरज होती. सोबत होती. पण मागील काही दिवसांपासून ती पण आपल्या पासून दूर दूर जात आहे असे वाटत होते. माझ्यापेक्षां तिला मुलांच्या भल्यासाठी सर्व करणे, नातवंडांच्या कलाकलाने घेणे, सुनांना सांभाळणे म्हणजे त्यांना रुचेल, पटेल आवडेल तसेच वागणे हे करण्यातच तिचा दिवस कधी संपतो ते तिला समजतच नाही. रात्री सुध्दां तिचे काम संपून मुले त्यांच्या बेडरूममध्ये जाईपर्यंत माझ्याकडे तिचे लक्षही जात नाही. ती येईपर्यंत मला गाढ झोप लागून जाते. मग त्यावेळी तरी चार गोष्टी कशा बोलणार? ती करते त्यांत चूक काहीच नसते. पण त्यामुळे मला मात्र एकटेपणा जास्त जाणवतो. तिच्याकडून मी दुर्लक्षित झाल्यासारखे वाटते.ती मला गृहीत धरते आहे असे मला वाटल्या वाचून रहात नाही.
कित्त्येक वेळा मुलांचा आणि इतर कुटुंबियांचा किंवा मुलांच्या मित्रमंडळींचा गप्पांचा फड जमतो. अनेक विषय चर्चेला येतात.पण मी फारसे तोंड उघडत नाही. आपण मधे बोलून आपले मत मांडले तर ते आवडणार नाही असे वाटते. मला माझे मत विचारलेही जात नाही. चर्चेच्या ठिकाणी आपण आहोत याकडेही कोणाचे लक्ष नसते. आपणास दुर्लक्षित केल्याची भावना होऊन जाते. अनेक वेळा तसे नसतेही पण माझ्या म्हणण्यात कोणाला रस नाही असे वाटून घेऊन मीच गप्पात मोकळेपणाने भाग घेत नाही.
या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजेच मला या वयात येत जाणारा एकटेपणा आहे असे मला वाटते. सतत सर्व लोकांमध्यें असूनही हा एकटेपणा मनाला खायला उठतो. मग वाटते पूर्वीच्या काळी वानप्रस्थाश्रम होता तो असाच काहीसा तर नसेल ना? इतकी एकटेपणाची भावना होऊन सुध्दां मी सकारात्मक रित्त्या त्याकडे पहातो आहे. आहे ते डोळसपणे स्वीकारून त्यातल्या त्यात आनंदाने कसे जगता येईल त्याचा प्रयत्न करीत असतो. सतत कशात तरी मन रमवित असतो. असे केल्यामुळे खरेच सांगतो मला दिवसात पांच मिनिटे सुध्दां रिकामा वेळ मिळत नाही. रोज रात्री बेडवर मनात दुसय्रा दिवशी काय कामे करायची आहेत त्याची उजळणी करून झोपतो आणि आजचा दिवस कसा छान गेला हे मनाला बजावित मला झोप केव्हा लागते ते समजतच नाही. सकाळी उठतानाच दिवसात काय करायचे त्याचे नियोजन करून देवाला नमस्कार करतो आणि एकट्याच्या दिवसाला सुरुवात करतो.

धन्यवाद अरविंद साने (मोनिका साने यांचे सासरे)

KULKARNI
LEGAL SERVICES
Estate Planning ■ Employment Law ■ HR Consulting
Eliminate Uncertainties
Estate plans assure that your wishes regarding health care, property distribution and final arrangements are honored, with:
• Wills and trusts
• Advance health care directives
• Durable power of attorney
• Guardianship for minors
Deepa A. Kulkarni, Attorney at Law
CA Bar License #287097
Davis
510 Fourth St.
www.kulkarnilegalservices.com
(530) 302-5602
Sacramento
555 University Ave., Suite 290

WISH MY TRIP
Get Pack Go
For lower Air Fares on Int'l Air Tickets
Bhavin (Bobby) Shah
510 400 TRIP (8747)
510 400 7784 (Fax)
www.WishMyTrip.com
Reservations@WishMyTrip.com
www.facebook.com/WishMyTrip
Like
Accredited by
IATAN
CST # 2117495-40

BMM 2017 अधिवेशन - आपलं अधिवेशन,

अनघा हुपरीकर यांना हा flyer पाठवल्याबद्दल धन्यवाद, तसेच BMM २०१७ च्या सर्व कमिटीला शुभेच्छा, मिशिगन येथे पुढील जुलैमध्ये भेटूच,

कविता: निळाई

कवियत्री: प्रज्ञा रत्नाकर मराठे (अनघा महाजनची आई)

(लेकटाहो ते फोलसम हा मार्च महिन्यात प्रवास करताना, रम्य निसर्ग, बर्फ, पर्वत बघून त्यांना सुचलेले हे काव्य)

बर्फाच्छादित शिखरान्मधली
अशी निळाई पिऊन घ्यावी
चमचम करती किरणे आणिक
निळ्या जळातुनी खेळ खेळती
गर्द दाटल्या वृक्षावरती
हिमफुले हि किती सांडली
शुभ्र बर्फाचा साज चढवुनी
कभिन्न काळे पत्थर सजती
गगनाचे प्रतिबिंब झेलुनी
नीलामृताने भिजते धरणी
धुंद बनवते आपल्या चित्ता
सृष्टीची हि किमया न्यारी
मनात वाजते मंद धून ती
कृष्णाची ती घननीळ बासरी
देश वेगळा, सय येई माहेरीची
भासे देव्हारयातील तिच निळाई

धन्यवाद, प्रज्ञाताई!

mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

नेहेमीची सदरे - हे करून बघा, हे माहित आहे का, सुविचार, चुटका, पाककृती.

- हे करून बघा:
    - सकाळी एक ग्लास गरम पाणी व एक केळ खा. असे केल्याने शरीराचा मेटाबॉलिझम वाढून जातो. केळ पचण्यास जास्त वेळ घेते, त्यामुळे बऱ्याच वेळेपर्यंत पोट भरल्यासारखे वाटते. याने पटकन एनर्जीपण मिळते!
- हे माहित आहे?
    - आपल्या लहानपणी माशा मारणे हा नुसता वाक्प्रचार नव्हता तर खरेच तसे करायचो. पण जरी एखाद्या घरच्या माशीला नाहीच मारले तरी ती नैसर्गिकरित्या लवकरच मरण पावते. माहिती आहे, बिचाऱ्या घरच्या माशीचे जीवन फक्त १४ दिवस असते! शी बाई, तिला विल अन ट्रस्ट करायला वेळ कसा मिळत असेल ग बाई?
    - हत्तीला पाण्याचा वास तीन मैल लांब येऊ शकतो. मलातर पाण्याला वास असतो हेच माहित नव्हते!
    - जगात सरासरी प्रत्येक मानवापाठी एक मिलिअन मुंग्या असतात! बापरे! वाचून मनाला, हातापायाला मुंग्या आल्या ना! आणि बर का, माहिती म्हणून सांगतो, मुंग्यांना फुफूसच नसते! .....चला एक बरे आहे त्यांचे आपल्यापेक्षा,.... मुंग्यांना दमा होतच नसणार!
    - इंग्लिश शब्द 'ऑक्टो' म्हणजे साधारणपणे आठ असा अर्थ होतो. मग ऑक्टोबर महिना १०वा कसा काय?
        - हे बरोबर आहे कि रोमन/लातिन भाषेत 'ऑक्टो' म्हणजे आठ आणि तो रोमन कॅलेंडरमध्ये आठवा महिनाच होता. पण जानेवारी व फेब्रुवारी महिने नंतर add झाले पण मग मुळचे ऑक्टोबर नाव तसेच राहिले! कालाय तस्मै नमः!

- सुविचार:
  - कोणी कौतुक करो व टिका करो. फायदा तुमचाच आहे. कौतुक प्रोत्साहन देते, टिका सुधारण्याची संधी!.
- खरच विचार करा:
  - बास्केटबॉलमध्ये बास्केट जो बनवतो त्याला टाळ्या पडतात, त्या आधी ज्या दुसरयाने प्रतिस्पर्ध्याला ब्लॉक केला असतो त्याचे नावहि दिसत नाही. मित्रानो, पहिला नाही होता आले तर दुसरा रोल तरी करा. मानापमान, मुख्यत्व् याला दुय्यम महत्व द्या. कधी पहिले व्हायचे असेल तर दुसरे व्हायला शिका (अजित नातू).
- चुटका कि प्रत्यक्ष अनुभव:
  - बायको: अहो, इतक्या हळू आवाजात कोणाशी बोलताय, तेसुद्धा इतक्या उशिरा रात्री?
  - नवरा: अग बहिणीशी बोलतोय.
  - बायको: हा मग ठीक, पण एव्हढ्या हळू आवाजात का?
  - नवरा: (मनात) कसे सांगू हिला, हिच्याच छोट्या बहिणीशी बोलतोय ते!
- हे माहित आहे?:
  - रजनीकांतचे सगळे काही आहे पण फेसबुक पेज नाही! का बरे! अहो, त्याने फेसबुक अकौंट उघडताच क्षणी ७ बिलिअन फालोवर लागू झाले व फेसबुक कंपनीचे सर्वर्स बंद पडले. . मग त्यांनी पेज काढून टाकले म्हणून आपण फेसबुक वापरू शकतो!
  - कॉम्पुटरचे संगणक केले, ठीक आहे, पण फेसबुकचे चेहरा-पुस्तक म्हणजे काहीही हं!
- कमाल कि नाही!
  - मुंबईत शिक्षकांनी विद्यार्थांना 'मी पाहिलेल्या क्रिकेट सामन्यावर' निबंध लिहायला सांगितला. पुण्याच्या विद्यार्याचा लिहून एका मिनिटातच झाला. त्याने लिहिले होते, "पावसामुळे सामना झाला नाही व घरी आलो"! गुरुजीपण पुण्याचे, त्यांनी त्याला धु धु धुतला!

पाककृती: उकडीचे मोदक by: सुनीती सहस्रबुद्धे (शुभांगी चिटणीसची आई) पान: १



उकडीचे मोदक

साहित्य - उकड

२ वाट्या तांदुळाची पिठी

२ मोठे चमचे मैदा

६ वाट्या पाणी

२ चमचे मीठ - २ चमचे तेल

सारण - ४ वाट्या ओले खोबरे

२ वाट्या गुळ

उकड ↓

कृती - प्रथम ६ वाट्या पाणी उकळून ठेवावे. त्यातील ३ वाट्या पाणी एका पातेल्यात घे द्यावे. परत जरा उकळी आली कि त्यात मीठ व तेल टाकावे. नंतर थोडी थोडी पिठी सोडत हलवावे. त्यातच मैद्याही मिक्स करून घालावा. झाकण ठेवत ३-४ वाफ आणावी. लागेल तसे आणखी पाणी घालावे. चांगला गोळा तयार झाला कि →

पाककृती: उकडीचे मोदक by: सुनीती सहस्रबुद्धे (शुभांगी चिटणीसची आई) पान: २



चला तर मग, असे मोदक करून बघा. जमले तर, सुनीतीताईना धन्यवाद जरूर कळवा, व आम्हाला खायला बोलवा!

Reliance SuperMart - The Fresh Choice in Quality Produce

Reliance SuperMart selects Fresh Quality Produce from Selected Local Growers. Our Customers want the Best for their Families and We Deliver!

Reliance SuperMart brings Folsom Community High Quality Fresh Produce and other Healthy Products.
This is the place do your Indian grocery shopping if you live in Folsom or nearby areas.

Store location is 297 Iron Point Road, Folsom, Ca 95630 and website address is www.reliancesupermart.com.

शब्दकोडे



आडवे शब्द :

१. अर्थ, आशय, हेतू, इच्छा
४. समज, ज्ञान
६. नाटक-सिनेमात अभिनय करणारा
७. घोडा
९. मर्कट
१०. स्वगतीने, धरोधर
११. पदार्थाचा जडपणा किंवा महत्त्व, दबदबा
१३. धाक, भीती
१५. कलंक किंवा धब्बा किंवा वस्तू
१७. रुधिर

१८. प्रखर
२१. कूप, धाव
२२. खाद्यपदार्थ, शिधा
२४. पुष्कळ वेळ वाट पाहण्याची धिकाटी
२५. खिडकी/दरवाजा यातून येणारे सूर्याचे किरण, उन्हाचा भाग

उभे शब्द :

१. दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा
२. काठ, किनारा किंवा बाजू, पक्ष, संघ
३. एक पक्षी
४. स्थूल किंवा दाट
५. वस्ती
८. गर्द
९. गळा किंवा आदर
१०. बलिष्ठ, ताकदवान
१२. सर्वांना माहित असलेले, प्रसिध्द
१४. सर्व प्रकारचे कौशल्य असलेली किंवा विविध गोष्टीत रस असलेली व्यक्ती
१६. टोचणी
१९. ताप
२०. रानातील
२१. क्रिया
२२. खूप, जास्त

२३. दम, जोराचा श्वासोच्छ्वास

Links to 2016 event photos

Rangapanchami Photos :

https://goo.gl/photos/DjWQNCSQc7kjiy9K8

https://goo.gl/photos/3kTommwLJac81n1H8

Gudhipadwa & Maharashtra Din Photos :

https://goo.gl/photos/op9CPN2epquqnXCx6

https://goo.gl/photos/w92byuhSodgyLnhd8

Maitra Jeevanche Photos :

https://goo.gl/photos/P4HfXUXeuWTEZJxU7

https://goo.gl/photos/B4mNP6wW7tKiHMhPA

Picnic Photos :

https://goo.gl/photos/vEJMRfS43xC9ZRJC9

https://goo.gl/photos/Roxo3XZNtW3cGw6L8

Ganapati photos :

https://goo.gl/photos/cALT9t8euk1XdumE9

https://goo.gl/photos/67Xorut6udNkGW7K8

KKG natak photos:

https://goo.gl/photos/obHCGsJCBTuqDkNY7

https://goo.gl/photos/sQkCw73et5jcEceg7

Dr. vikas Amte felicitation photos:

https://goo.gl/photos/VqYRXejrzMi2fUAV6

Kojagiri photos:

https://goo.gl/photos/WfbaRRYFoG8DpQWc9